उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करणेसाठी शासकीय अनुदानाची रक्कम महावितरण कंपनीस अदा करण्याकरीता नवीन लेखाशीर्ष उघडणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सौरप-२०२६/प्र.क्र.११६/ऊर्जा-७ (ई-१५४२०१८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १६ जुलै, २०२६.

वाचा :- १) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. सौरप्र-२०२४/प्र.क्र.११/ऊर्जा-७,दि.१५.०३.२०२४.
२) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-१, मुंबई यांचे पत्र क्र.सं:ख.वि./चा-१/उद्योग,ऊर्जा तथा कामगार विभाग/यूओआर-४८/ २०२६-२७/ ३१२, दिनांक २७.०५.२०२६

प्रस्तावना:-

दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व उच्चदाब व अतिउच्चदाब उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करणे व त्याकरिता लागणाऱ्या एकूण रु. ४२०८ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक जमीन जलसंपदा विभागाने महावितरण कंपनीस हस्तांतरण करण्यात येणार आहे तसेच सदर प्रकल्प राबविण्यासाठी महावितरण कंपनी ही अंमलबजावणी यंत्रणा आहे. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक १०५२ मेगावॅट क्षमतेसाठी रु. ४ कोटी प्रति मेगावॅट नुसार एकूण प्रकल्प खर्च अंदाजे रु. ४२०८ कोटी इतका आहे. त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा ८० टक्के (रु. ३३६६ कोटी) व सौर उत्पादकाचा हिस्सा २० टक्के (रु.८४२ कोटी) इतका आहे. सदर योजनेसाठी राज्यशासनाकडून अनुदान महावितरण कंपनीला उपलब्ध करुन देण्यासाठी एक खर्चाचे लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय दि. १५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व उच्चदाब व अतिउच्चदाब उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करणेसाठी शासकीय अनुदानाची रक्कम राज्यशासनाकडून अनुदान स्वरुपात, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस वितरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष उघडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. **महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस अनुदान वितरणाचे लेखाशिर्ष:-**

	इंग्रजीत	**मराठीत**
मागणी क्र.	K-06	के-०६
मुख्य लेखाशिर्ष	2810 - New and Renewable Energy	२८१० -नवीन व नवीकरणीय ऊर्जा
उप मुख्य लेखाशिर्ष	(00)	(००)
गौणशिर्ष	101- Grid interactive and Distributed Renewable Power	१०१ - वीज जोडणी आणि विविध ठिकाणी निर्माण होणारी नवीकरणीय ऊर्जा
गटशिर्ष	(00)	(००)
उपगटशिर्ष	(00)(01) - Solarization of Lift irrigation Schemes-Grant to Maharashtra state Electricity Distribution company (Scheme)	(००) (०१) - उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण-महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस अनुदान (कार्यक्रम)
उद्दीष्टे	31- grant in Aid (Non Salary)	३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)
संगणक सांकेतांक	28101382	२८१०१३८२

३.	सदर शासन निर्णय, नियोजन विभाग अनौ.सं.क्र.२३९/२०२६, दि.१५.०६.२०२६, महालेखापाल कार्यालय, मुंबई अनौ. क्र.सं:ख.वि./चा-१/उद्योग,ऊर्जा तथा कामगार विभाग/यूओआर-४८/ २०२६-२७/ ३१२, दिनांक २७.०५.२०२६ व वित्त विभागाचा अनौ.सं.क्र. २९०/२०२६, दि. २५.०६.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०७१६१७४०२०३४५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.07.16 17:41:47 +05'30'

(जयंत सागडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.	मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२.	मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३.	मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४.	मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५.	मा. मंत्री (अपारंपारिक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६.	मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७.	सर्व मा. मंत्री व सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८.	सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई,
९.	मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०.	अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
११.	अपर मुख्य सचिव, (जलसंपदा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.	सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३.	सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई, (पत्राने)
१४.	अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१५.	अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
१६.	अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
१७.	महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
१८.	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर,
१९.	महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/ नागपूर,
२०.	अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१.	निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२२.	सह सचिव (ऊर्जा-७), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३.	कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२४.	कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२५.	कार्यासन अधिकारी (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई-३२,
२६.	निवड नस्ती, ऊर्जा-७, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.